३२०/०१
१०/०१

४९२५

क्रमांक: एनजीसी २०००/४५८२३/अमरावती/मवि-१,
शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण),
महाराष्ट्र राज्य, पुणे - १.
दिनांक :- २४.५.२००१

संदर्भ :- १) शासन निर्णय क्रमांक एनजीसी/२०९१/(३५९७)/विशि-२अ,
दिनांक ८.८.९१

२) शासन परिपत्रक क्रमांक एनजीसी/१०९३/(५९१८)/मवि-३,
दिनांक १९.६.९५

३) शासन परिपत्रक क्रमांक युजिसी/११९६/(विस३)/(४०१/९६)/
मवि-३, दिनांक ५.६.९६

४) सहसंचालक, उच्च शिक्षण, अमरावती विभाग, अमरावती यांचे
पत्र क्रमांक सर्स/उशि/अनु-२/१२१८/२००१, दिनांक २८.३.२००१.

आदेश :-

उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग, निर्णय क्रमांक एनजीसी-२०९३/(४७७७)/युसनआप-२अ, दिनांक १८.१०.९३ अन्वये शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांना प्रदान केलेल्या अधिकारान्वये व संदर्भाधिन सहसंचालक, उच्च शिक्षण, अमरावती यांच्या पत्रान्वये केलेली शिफारस विचारात घेऊन खालीलप्रमाणे महाविद्यालयाला सहाय्यक अनुदान मंजूर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | संस्थेचे नांव | महाविद्यालयाचे नांव | विद्याशाखा | शैक्षणिक वर्ष | अनुदान मंजूर केलेली टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १. | धर्मवीर दिलीपराव रहाटे बहुउद्देशिय शिक्षण संस्था, मेहकर, जि. बुलढाणा. | कला व विज्ञान महिला महाविद्यालय, मेहकर, ता. मेहकर, जि. बुलढाणा | कला १ तुकडी | २०००-२००१ | १०० टक्के |

वरील महाविद्यालयातील कला शाखा सन २०००-२००१ च्या मान्य तुकडीवर सन २००१-२००२ पासून वेतनेतर अनुदानास पात्र होईल.

विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांनी अनुदान निर्धारण करून ते अदा करण्यापूर्वी खालील अटींची पूर्तता होते किंवा कसे, याची खातरजमा करून घ्यावी.

या आदेशान्वये ज्या विद्याशाखांना अनुदान मंजूर करण्यात आले आहे, त्या विद्याशाखेमध्ये परीक्षेला प्रथम वर्षी प्रत्यक्ष बसलेल्या विद्यार्थ्यांची संख्या विद्यापीठाच्या निकालपत्रावरून [illegible] द्यावी व ती बरोबर असल्याची खात्री करून घ्यावी. नंतरच अनुदान निर्धारण करून अनुदान मंजूर करण्यात यावे.

१] या आदेशान्वये ज्या विद्याशाखांना अनुदान मंजूर करण्याबाबत आदेश निर्गमित करण्यात आले आहेत, त्या प्रत्येक विद्याशाखेतील प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षातील प्रत्येक विषयासाठी शासन निर्णय क्रमांक एनजीसी/१०९३/[५९१८]/मशि-३, दिनांक १९ जून, १९९५ व शासन निर्णय दिनांक १७ मार्च, १९९९ अन्वये खालीलप्रमाणे विद्यार्थी उपलब्ध असणे आवश्यक आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | शहरी भाग | : २४ विद्यार्थी |
| २. | आदिवासी व दुर्गम विभागातील मुलींची महाविद्यालये, ग्रामीण विभागातील महाविद्यालये आणि ५०,००० पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या ~~शहरातील मुलींची महाविद्यालये व "ड"~~ वर्ग नगरपालिका क्षेत्रातील महाविद्यालये. | : १० विद्यार्थी |

विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, अमरावती यांनी अनुदान निर्धारणाच्या वेळी प्रत्येक विषयासाठी वरीलप्रमाणे विद्यार्थी उपलब्ध आहेत किंवा कसे, याची खात्री करून घ्यावी व त्यानंतर त्या विषयासाठी नेमलेल्या शिक्षकांच्या वेतनावरील खर्चावर अनुदान मंजूर करून अदा करावे.

२] अनुदान निर्धारण करतांना फक्त शासनाने मान्यता दिलेल्या तुकड्याच विचारात घ्याव्यात.

३] जी विद्याशाखा अनुदानावर आणली आहे, त्या विद्याशाखेचा कार्यभार विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांनी तपासून नियमानुसार शिक्षक व शिक्षकेतरांची पदे मंजूर करावीत.

४] महाविद्यालयास/विद्याशाखेस अनुदान मंजूर केल्यामुळे जी पदे निर्माण होतील त्या पदांवर संबंधित विषयांच्या अतिरिक्त शिक्षकांना शासनाच्या निर्णयाप्रमाणे सामावून घ्यावे.

.. ३ ..

५] अनुदान निर्धारण करताना विद्यापीठाने व शासनाने त्या संबंधित महाविद्यालयांच्या विद्याशाखांना व तुकड्यांना संलग्नीकरण मंजूर केल्याची खात्री करून घ्यावी.

६] शिक्षक व शिक्षकेतर पदांवरील नियुक्त केलेले कर्मचारी शासनाच्या व विद्यापीठाच्या आदेशानुसार सेवाप्रवेशाच्या अटी पूर्ण करणारे असावेत. शिक्षक संवर्गातील नेमणुकींना विद्यापीठाची मान्यता प्रदान केलेली असावी. मागासवर्गीय संवर्गाच्या आरक्षणाबाबत असलेल्या तरतुदींचे पालन करावे.

७] शासन निर्णय क्रमांक एनजीसी/१३७७/१२२१६६/(२२)/सेल, दिनांक २१.९.७७ व शासन परिपत्रक क्रमांक एनजीसी/१०९६/(४५८/९६)/विशि-४, दिनांक १९.४.१९९७ अन्वये महाविद्यालयास देण्यात येणाऱ्या वेतनाचे धनादेश बँकेत वेतन खात्यात जमा करण्यात येत असे. त्याच बँकेत त्या महाविद्यालयातील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वैयक्तिक खाते उघडणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे महाविद्यालयाचे बँकेत जमा होणाऱ्या वेतनाच्या रकमेतून संबंधित कर्मचाऱ्यांच्या खाती नियमाप्रमाणे वेतनाची रक्कम ट्रान्सफर करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे संबंधित महाविद्यालये काटेकोरपणे कार्यवाही करीत आहे, याची खात्री करून घ्यावी.

८] महाविद्यालयाच्या मान्यतेबाबत/संलग्नीकरणाबाबत शासनाने/विद्यापीठाने विहित केलेल्या सर्व अटींची पूर्तता केलेली आहे.

९] संबंधित महाविद्यालयांनी शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या/करण्यात येणाऱ्या आदेशांचे पालन करणे आवश्यक आहे.

१०] ज्या शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची नेमणूक केली आहे ते शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी उच्च माध्यमिक विद्यालयात/माध्यमिक शाळेत संस्थेत पूर्णवेळ किंवा अर्धवेळ काम करीत नाही.

११] संस्थेने महाविद्यालयासाठी स्वतःच्या मालकीच्या पुरेशा इमारतींची, वर्गखोल्या व इतर भौतिक सुविधांची सोय उपलब्ध करून दिलेल्या आहेत.

१२] विद्यापीठाची रितसर परवानगी घेऊन पूर्णवेळ प्राचार्यांची निवड समितीद्वारा नेमणूक करणे आवश्यक आहे.

3 पुनी

१३] संस्थेविरुद्ध कोणत्याही तक्रारी नसाव्यात व न्यायालयीन प्रकरणे नसावीत. शासनाने वेळोवेळी घालून दिलेले नियम व निकष यांचे संस्थेने तंतोतंत पालन करावे.

१४] ज्या महाविद्यालयांना आर्थिक वर्षात रुपये २५ लाख किंवा त्याहून अधिक रकमेचे अनुदान देय होईल, अशा महाविद्यालयांनी सी. ए. जी. [डी.पी.सी.] अधिनियम १९७१ मधील परिच्छेद १४ नुसार, महालेखापाल यांच्या लेखापरीक्षा पथकाकडून लेखापरिक्षण करणे बंधनकारक राहील.

वरील महाविद्यालयाला वेतनावर होणारा खर्च खाली नमूद केलेल्या अर्थशिर्षाखाली दाखवून तो सन २००१-२००२ मधील आर्थिक तरतुदीमधून भागविण्यात यावा. तसेच जिल्हा नियोजन मंडळाकडून निधी उपलब्ध झाला तरच अनुदान देय होईल.

अर्थशिर्ष :-

"२२०२ - सर्वसाधारण शिक्षण - ०३ - विद्यापीठीय उच्च शिक्षण १०४ अशासकीय महाविद्यालयांना व संस्थांना पंचवार्षिक योजनांतर्गत योजना १०४ [एक][बी] अशासकीय वाङ्मय, विज्ञान, वाणिज्य महाविद्यालयांना विस्तारासाठी अनुदान [२२०२०४०५] ४१ सहाय्यक अनुदाने मागणी क्रमांक डब्ल्यु-२."

शिक्षण संचालक, [उच्च शिक्षण],
महाराष्ट्र राज्य, पुणे - १.

प्रति,

१] सहसंचालक, [उच्च शिक्षण], अमरावती विभाग, अमरावती.
२] महालेखापाल, [लेखापरीक्षा] महाराष्ट्र, नागपूर.
३] महालेखापाल, [लेखा व अनुज्ञेयता] महाराष्ट्र राज्य, नागपूर.
४] जिल्हा कोषागार अधिकारी, बुलढाणा.
५] मा. सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ३२.
६] प्राचार्य, कला व विज्ञान महीला महाविद्यालय, मेहकर, ता. मेहकर, जि. बुलढाणा.

अराह्/८५०१

प्राचार्य
कला व विज्ञान महिला महाविद्यालय
मेहकर, जि. बुलढाणा